मुलांच्या नजरेतून...

# ह्या पिढीचं कठीणच आहे!

**शुभांगी तानाजी तावरे**
कमला निंबकर बालभवन, फलटण

शाळेत माझा दुपारचा तास होता. मी वर्गात गेले तेव्हा मुलांचं आपापसात बोलणं चालू होतं. एक दोघांच्या गप्पांचा आवाज जरा जास्तच मोठा वाटत होता. मी म्हटलं, ''जरा हळू बोला रे. डोकं नाही का दुखत? घरी पण येवढ्याच मोठ्याने बोलता का?'' शुभम म्हटला, ''बाई, येवढ्या मोठ्याने आमच्या घरी आमचा टीव्ही बोलतो.'' ''तू आवाज कमी करायला का सांगत नाहीस?'' मी विचारले. ''बाई, भाऊ म्हणतो, माझा आवडीचा कार्यक्रम आहे. नंतर कमी कर. त्या कार्यक्रमानंतर मग घरच्यांच्या सीरियल्स सुरू होतात.''

या विषयावर आता सगळ्यांनाच बोलायचे होते. ''बाई, मी जर नॅशनल जिओग्राफिक चॅनल लावला तर आई म्हणते, बदल ते. काय खेकडे, साप, विंचू बघत बसला आहेस! मग ते बदलून ती आपली लाडकी सीरियल लावते. दोन दोन वर्ष चालणारी सासू-सुनेची. मला नाही आवडत सीरियल्स.'' ''मला पण बोलणी बसतात. मी खेळाचा चॅनल बघत बसतो म्हणून.''

वर्गातल्या निम्म्या मुलांनी आपल्याला टीव्ही बघायला बिल्कुल आवडत नाही. पण इंटरनेटवर गाणी ऐकणे, गेम्स खेळणे, मोबाईलवर मित्राशी गप्पा मारणे, चित्र काढणे आवडते किंवा गोष्टींची पुस्तके वाचणे आवडते असे सांगितले. पालक स्वत: आपल्या आवडीचे कार्यक्रम पाहतात. पण आम्हाला आमच्या आवडीचे मनोरंजन करू देत नाहीत. सारखे अभ्यास कर, अभ्यास कर. म्हणून मागे लागतात. असे मुलांचे म्हणणे होते. प्रत्येक पालकाला आपल्या मुलाने डॉक्टर किंवा इंजिनियर बनायला हवे होते. त्यासाठी भरमसाठ मार्क मिळवायला हवेत, मग अभ्यास करायला लावण्याशिवाय पालक दुसरं काय करणार? मुलांचे म्हणणे - आम्हाला पायलट बनावेसे वाटते, खेळात करियर करावीशी वाटते, किंवा सिनेमॅटोग्राफी करावीशी वाटते, सतत अभ्यासाचा आम्हाला अगदी कंटाळा येतो.

एक मुलगा तर म्हणाला, ''बाई लहानपणी मला भुताची, अंधाराची भिती वाटत असे. आता अभ्यासाची वाटते.'' दुसरा म्हणाला, ''बाई पाचवी - सहावीपर्यंत मला चांगले मार्क पडायचे. मग आई-बाबा बक्षिस द्यायचे. पण आता कितीही अभ्यास केला तरी इतके मार्क पडत नाहीत. कुणी बनवले हे असले विषय?''

त्यातल्या त्यात आई जास्त समजून घेते, पण बाबांचा मात्र 'मी म्हणतो म्हणून' चाच खाक्या असतो. असे निम्म्याहून अधिक मुलांचे म्हणणे होते. आईविषयी मुलींची मुख्य तक्रार आढळली ती घरातील कामांविषयी. ''बाई, मी अभ्यासाला बसले असले तरी भांडी लाव, येवढा केर काढून मग पुन्हा बस अभ्यासाला. असे आई सांगते. मुलांचं बरं असतं.'' यावर वर्गातील मुले चिडून म्हटली, ''मग आम्ही बाहेरची कामे करतो.'' ''हो बाहेरची कामे म्हणे ! माझा भाऊ बाहेर सामान आणायला गेला तर बाहेरचाच होतो. घरी आल्यावर म्हणतो, मित्र भेटला म्हणून उशीर झाला. आणि मी मात्र जरा उशिरा आले, तर लगेच म्हणतात एवढा उशीर करतात का? वेळेवर घरी येत जा.'' मुलींनीही कैफीयत मांडली.

''बाई, उलट शाळेतही मुलींनाच झुकते माप असते. मुली उशिरा आल्या तर शिक्षक त्यांना शाळेत येऊ देतात. मात्र मुले उशिरा

आली तर त्यांना वर्गात घेत नाहीत.'' मुलांनीही विषय थोडा बदलून भांडणाचा पवित्रा कायम ठेवला.

मुलामुलांच्यात तू-तू मैं-मैं काही संपेना. मग मी त्यावेळी चाललेली चर्चा तेव्हापुरती तरी बंद केली.

दुसऱ्या दिवशी मुले बोलायला अगदी उत्सुक होती. त्यांची मते जाणून घ्यायला मीही उत्सुक होते. कालचे अर्धवट राहिलेले बोलणं आम्ही पुढे सुरू केले.

तुमचे आई-बाबांशी इतके मतभेद होतात, तरी तुम्हाला घरी सुरक्षित वाटते का? मी विचारले तर ८० टक्के मुलांनी 'हो'म्हणूनच सांगितले. मात्र हीच मुले अपयशामुळे नैराश्य आले की पळून जावेसे वाटते असे म्हणतात. पळून कुठे जाणार, काय करणार याला मात्र त्यांच्याकडे काही उत्तर नव्हते. किंबहुना तसा काही याविषयी विचारच त्यांनी केलेला दिसला नाही. समस्येला तोंड देणे, मार्ग काढणे यापेक्षा निघून जाणं हाच पर्याय मुलांना सोपा वाटत होता. तीन मुलांनी मात्र सांगितले की आम्ही काहीतरी काम करू. एकाने सांगितले की, 'मी मामांकडे जाईन' आणि त्यांच्या व्यवसायात काम करेन. बाकी सर्वांना अपयशातून बाहेर पडण्यासाठी धडपड करण्याऐवजी लांब पळून जावे किंवा झोपावे किंवा कोंडून घ्यावे असेच वाटत होते. परिक्षेत, खेळात, स्पर्धेत अपयश आले तर पालक फक्त रागावतात, ओरडतात, पाणउतारा करतात, परंतु मुलाला समोर बसवून अपयश येण्यामागची कारणे, सुधारणा करण्यासाठी काय करता येईल, याची चर्चा करीत नाहीत. आपल्या स्वत:च्या आयुष्यातील अपयशांबद्दल बोलत नाहीत. फक्त आपण ह्यांच्या अपेक्षांना पुरे पडलो नाही एवढेच मुलांना पोचते आणि मुलाच्या पायाखालची जमीन सरकते. आई वडिलांनी आपले चांगले मित्र बनून आपल्याशी मोकळेपणाने बोलावे असे सर्व मुलांना वाटत होते. मात्र तासन तास टी. व्ही बघत बसणे, मोबाईलवर बोलणे यामुळे आमने-सामने बसून एकमेकांशी बोलायला पालकांना आणि मुलांना वेळच नसतो. कशालाच नाही म्हणायचे नाही, मुले मागतील तितके पैसे व मागतील त्या वस्तू त्याना फारशी खाराखुरी न करता देऊन टाकण्याच्या काही पालकांच्या वृत्तीमुळेही अशा मुलांना नकार पचवायला फार अवघड जाते. यश मिळाल्यावर आक्रमक, आनंदी होणारी मुले अपयश मिळाले की मात्र विलक्षण निराश होतात.

एकीकडे पालकांच्या वास्तव-अवास्तव अपेक्षांचे मुलांवर ओझे असतेच. उत्तम मार्कांबरोबरच मुले चित्रकलेत, खेळातही चमकली पाहिजेत अशी पालकांची इच्छा असते, दुसरीकडे मुलांना निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य आणि त्यासोबत येणारी जबाबदारी देण्याची टाळाटाळ करतात. मुलांना खूप वाटत होते की आपल्यावर जबाबदारी व विश्वास टाकावा. स्वत:चे निर्णय स्वत: घ्यायला प्रोत्साहन द्यावे. चित्रकलेच्या परीक्षेला बसू की नको? हा शर्ट घेऊ की तो? अगदी छोटे मोठे कुठलेही निर्णय असतील, प्रत्येक वेळी मला काय करावेसे वाटते, या ऐवजी मी असे केले तर आई-वडिलांना काय वाटेल हा विचार मनात येऊन मुले स्वयंनिर्णय घेण्याचे टाळतात. मोठ्यांनी दिलेल्या निर्णयामागे अनेकदा काही तार्कीक विचार असतोच असे नाही. केवळ -मी म्हणतो म्हणून कर -असेच बहुसंख्य पालक सांगतात.

मुलेही बऱ्याचदा मित्रांच्या सांगण्यावरूनच निर्णय घेतात असे आढळले. मैत्री कशी असावी असे वाटते? असे विचारल्यावर एकमेकांना समजून घेणे, सहवासात असणं महत्त्वाचे आहे असे मुले आवर्जून मांडतात. काहींच्या मते स्वभाव जुळला तरच मैत्री होते. तर काहींच्या मते छंद देखील एकच असला तर छानच पटते. ऐंशी टक्के मुलांच्या मते मैत्रीसाठी पैसा किंवा आर्थिक परिस्थितीचा मुद्दा महत्त्वाचा नाही. याच मुलांना जीवनात यशस्वी होण्यासाठी देखील पैशापेक्षा जीवनातील आनंद महत्त्वाचा आहे असे वाटते.

या मुलांशी गप्पा मारल्यावर त्यांचे विश्व जाणून घेतल्यावर मनात सहजच एक तुलना आपण ह्या वयाचे असताना कसे वागत असू याच्याशी झाली. तीसपस्तीस वर्षापूर्वीपेक्षा फारच वेगळे जीवन ही आजची मुले जगत आहेत. आमच्या घरी बऱ्यापैकी आर्थिक सुबत्ता होती. परंतु तरीही आपणहून काही मागायची पद्धतच नव्हती, आणि मागितले तरी ते लगेच कधीच मिळायचेही नाही. घरातील इतरांच्या सोई-गरजांशी ते बांधलेले असे. बाजारातून मिळणारी वस्तू आठवड्यानंतरच मिळे. घरची परिस्थिती बरी असली तरी लगेच ऐहिक सुख पायाशी लोटांगणे घेत नसे. शारीरिक कष्टांना तर पर्यायच नसे. गेल्या तीन दशकात परिस्थिती वेगाने आणि मुळापासून बदलली आहे. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या विस्फोटाने अनेक नवी आव्हाने समोर ठाकली आहेत. मात्र घरी आणि शाळेत असणारी शिक्षणपद्धती आणि मोठ्यांची मुलांशी वागण्याची पद्धत पूर्वीचीच राहिली आहे. तिथे बदल घडवून आणणे, मुलांना निर्णय प्रक्रियेत सामावून घेणे हे आपण मुलांचे देणे लागतो असे मला वाटते.

●

pssknb-phtn@bsnl.in